सेवापुस्तक अद्ययावत
ठेवण्याबाबत व त्याच्या
हस्तांतरणाबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२९/सेवा-२**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ३०.०१.२०१९

**वाचा** - शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.सेवापु-१०८७/४७४/सेवा-९, दि. २८.४.१९८७

## शासन परिपत्रक

महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ प्रकरण ४ मध्ये तसेच वित्त विभागाच्या संदर्भांकित दिनांक २८.४.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे सेवाभिलेख लिहणे व जतन करणे याबिषयी सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, विभागांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तक अद्ययावत ठेवण्यात येत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे सेवानिवृत्तीच्या वेळी अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ मिळण्यामध्ये अडचणी उद्भवतात. तसेच विभागांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांची बदली/पदोन्नती झाल्यानंतर त्यांचे सेवापुस्तक संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या सुपूर्द करण्यात येत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे. अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तक त्यांच्या स्वाधीन केल्यानंतर जर ते गहाळ झाले आणि संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याकडे अद्ययावत दुय्यम सेवापुस्तक नसेल तर संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापुस्तक पुनश्चः तयार करण्यात अडचणी निर्माण होतात व त्यामुळे संबंधितास सेवाविषयक लाभ मिळण्यामध्ये विलंब होतो. त्यामधून न्यायालयीन प्रकरणे उद्भवतात. त्यामुळे पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

अ) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील तरतुदींनुसार विभागांतर्गत अधिकारी/कर्मचारी यांची सेवा पुस्तके अद्ययावत करण्यात / ठेवण्यात यावीत.

आ) अधिकारी/कर्मचारी यांची बदली/पदोन्नती झाल्यास त्यांचे सेवा पुस्तक (मूळ प्रत) संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या ताब्यात देण्यात येऊ नये. सदर सेवा पुस्तक एका कार्यालयाकडून दुसऱ्या कार्यालयाकडे विहीत मार्गानेच पाठविण्यात यावे.

इ) ज्या कार्य़ालयाने त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांना सेवा पुस्तकाची दुय्यम प्रत दिली तसेल तर ती तात्काळ त्यांना उपलब्ध करून द्यावी. तसेच कर्मचाऱ्यांकडील ह्या दुसऱ्या प्रती नियमानुसार वेळोवेळी त्यांच्याकडून उपलब्ध करून घेण्यात येऊन, मूळ सेवा पुस्तकातील नोंदीनुसार कर्मचाऱ्यांस अद्ययावत व साक्षांकित करून देण्यात याव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०१३०१०४४३२०६१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swati Sachin Patil

Digitally signed by Swati Sachin Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9a405e951c6ec6cfa245ccd2e14e35d61d10410423aed62a90cb7f77f7905b4d, serialNumber=41a9218232bbaea65861213d86d108ea7c48905da5f33dba9c8f6662cb8f9e18, cn=Swati Sachin Patil
Date: 2019.01.30 11:30:18 +05'30'

( स्वा.स.पाटील )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई पत्राने.
२) महालेखापाल-१ / २ (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
३) सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
५) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सा.बां.विभाग, मुंबई
६) संचालक, उपवने व उद्याने, सा.बां.विभाग, मुंबई
७) सर्व अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ
८) मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (उपक्रम वगळून) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) मा. मंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०) मा. राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (उपक्रम वगळून)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
११) मा. राज्यमंत्री सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) प्रधान सचिव (सा.बां.) यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) सचिव (रस्ते) यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) सचिव (बांधकामे) यांचे स्वीय सहाय्यक , सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई.
१५) कार्यासन सेवा-१,सेवा-३,आस्थापना- १/३, सेवा-६, संगणक कक्ष, सा.बां.विभाग,मंत्रालय, मुंबई,
१६) कार्यासन सेवा-२ (निवडनस्ती) सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय,मुंबई.